जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ५४९ दिनांक -२८/१२/२०२४**

सहकारनगर पोलीस स्टेशन,पुणे शहर

# दोन सराईत गुन्हेगार कडुन २,४०,०००/- किं.च्या ८ दुचाकी जप्त

दि.२६/१२/२०२४ सहकारनगर पोलीस स्टेशन कडील तपास पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार व सहकारनगर मार्शल असे वाहन चोरी, गुन्हे प्रतिबंधक पेट्रोलिंग व गुन्हेगार चेकिंग करीत असताना एका यामाहा दुचाकी गाडीवर बसुन दोन इसम भरधाव वेगाने बिकानेर चौकाकडे जाताना दिसले. त्यांचा संशय आल्याने त्यांचा पाठलाग करुन त्यांना थोडयाच अंतरावर गाडीसह थांबवुन ताब्यात घेवुन त्यांना त्यांचे नाव पत्ता विचारता त्यानी त्यांची नावे **१) अन्वर सलीम शेख वय २१ वर्षे धंदा गॅरेज काम रा.नुर मंहम मस्जिद गल्ली दाते बसस्टॉप सहकारनगर पुणे २) फरीद लालापाशा सय्यद वय १९ वर्षे धंदा गॅरेज काम रा.नुर मंहमद मस्जिद गल्ली दाते बसस्टॉप सहकारनगर पुणे** असे असल्याची सांगितले.

त्यांचे ताब्यात एक यामाहा गाडी मिळुन आली त्या गाडी बाबत त्याच्याकडे चौकशी करता सदरची गाडी आम्ही दोघांनी साधारण दोन महिन्यापुर्वी दाते बसस्टॉप येथील रोडवरुन चोरली असुन तीचा वापर करुन ती के.के.मार्केट भागात पार्क केली होती. सदर गाडी विकण्यासाठी आम्ही गि-हाईक शोधत होतो. असे कबुल केले सदर गाडी बाबत सहकारनगर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.३३२/२०२४ भा.न्या.स.२०२३ चे कलम ३०३(२) प्रमाणे गुन्हा दाखल असल्याची माहिती मिळाल्याने सदर आरोपीकडे अधिक चौकशी करता त्यांनी आणखी सात दुचाकी वाहने चोरल्याचे सांगितले सदर आरोपी कडुन **एकुण २,४०,०००/- रु किं.ची ८ वाहने हस्तगत करण्यात आली असुन सहकारनगर पोलीस ठाण्याकडील एकूण ०६ वाहनचोरीचे गुन्हे उघड करण्यात आले आहेत.** सदर आरोपी वर हत्यार बाळगले बाबत ०१ गुन्हा सहकारनगर पोलीस स्टेशन येथे दाखल आहेत.

सदरची कामगीरी मा.अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशीक विभाग श्री.प्रविणकुमार पाटील मा.पोलीस उपायुक्त परि.-२,श्रीमती स्मार्तना पाटील मा.सहा.पोलीस आयुक्त,स्वारगेट विभाग श्री.राहुल आवारे सहकारनगर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.छगन कापसे,यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे सहा पोलीस निरीक्षक सागर पाटील,सहा.पो उप निरी बापु खुटवड,पोलीस अंमलदार अमोल पवार ,किरण कांबळे,बजरंग पवार,चंद्रकांत जाधव,विनायक एडके,महेश मंडलिक,अमित पदमाळे,सागर सुतकर,खंडु शिंदे,योगेश ढोले,महेश भगत,अभिमान बागलाने,बबलु भिसे,सचिन येनपुरे,नामदेव केंद्रे यांनी केली आहे.


Hope for the
CHILDREN
Foundation
सहकारनगर पोलीस स्टेशन

# प्रेस रूम गुन्हे शाखा,
# पुणे शहर